जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 NOV 2023
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये आज सामंजस्य करार करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील, पी. एस. पाटील, विलास शिंदे आदी उपस्थित होते.

# पिकांच्या नव्या वाणांवर होणार संयुक्त संशोधन

## शिवाजी विद्यापीठ- राहुरी विद्यापीठात करार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठ आणि राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये आज सामंजस्य करार करण्यात आला. त्याच्या माध्यमातून आजरा घनसाळ, काळा जिरगा आदी स्थानिक पिकांच्या नव्या वाणांवर संयुक्तपणे संशोधन केले जाणार आहे. या कराराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी संशोधनाचे नवे दालन खुले होणार आहे.

या करारावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील प्रमुख उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाने आजरा घनसाळ, काळा जिरगा, काळा भात या स्थानिक देशी वाणांच्या उन्नतीचे जे काम केले आहे, त्याचे परीक्षण राज्य आणि देश पातळीवर करण्यासाठी या करारातून पुढील कार्य होणार आहे.

भविष्यात विद्यापीठातून तयार होणारे विविध पिकांचे आणि औषधी वनस्पतींचे सुधारित वाण आणि त्याची चाचणी राज्य व देश पातळीवरील कृषी विद्यापीठाद्वारे केली जाईल. क्षेत्र प्रकल्प संशोधन प्रकल्पांसाठी पदव्युत्तर विद्यार्थ्यांना दोन्ही विद्यापीठांचे दालन खुले होणार आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'सामंजस्य करार समाजास आणि शेतकरी वर्गाला उपयुक्त ठरेल. कृषी आणि अकृषी विद्यापीठातील दरी कमी होईल.

जगाच्या पाठीवरील प्रत्येक वनस्पती उपयोगी असते. त्याचे संवर्धन करून मानवाच्या विकासामध्ये त्या वनस्पतींचा कसा उपयोग होईल, यावर संशोधकांनी महत्त्वपूर्ण काम करणे आवश्यक आहे.'

या वेळी कृषी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एस. शिर्के, महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे, सदाशिव पाटील, डॉ. ए. ए. पिसाळ, हेमंत पाटील, सुनील कराड, शैलेश कुंभार, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एस. एच. ठकार, व्ही. डी. जाधव, एन. बी. गायकवाड, एस. जी. घाणे, के. बी. पवार, एस. ए. पाटील, एम. एस. निंबाळकर, एस. एम. पाटील, जे. पी. जाधव, के. डी. सोनवणे, ए. ए. देशमुख, एस. आर. एनकंची, पी. डी. पाटील उपस्थित होते.

25 NOV 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ-महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये सामंजस्य करार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ व महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्यात शुक्रवारी सामंजस्य करार झाला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने पदव्युत्तर विद्यार्थ्यांना फिल्ड प्रोजेक्ट, जॉब ऑन ट्रेनिंग, किंवा रिसर्च प्रोजेक्टसाठी दोन्ही विद्यापीठांचे दालन खुले होणार आहे.

यावेळी महात्मा फुले कृषी विद्यापीठ तर्फे कुलसचिव डॉ. व्ही. एस. शिर्के, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सातापा खरबडे, वित्त अधिकारी सदाशिव पाटील, कृषी संशोधन केंद्राचे संचालक डॉ. ए. ए पिसाळ, डॉ हेमंत पाटील, डॉ सुनील कराड, डॉ. शैलेश कुंभार उपस्थित होते.

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील म्हणाले, समाजाच्या आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी महाराष्ट्र राज्यातील चार, देशातील सत्तर कृषी विद्यापीठांमध्ये संशोधन कार्य सुरू आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सामंजस्य करार समाजास व शेतकरीवर्गासाठी उपयुक्त ठरेल.

करारांतर्गत भविष्यात विद्यापीठातून तयार होणारे विविध पिकांचे आणि औषधी वनस्पतींचे सुधारित वाण व त्याचे राज्य व देश पातळीवरील ट्रायल्स ही महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने केले जाईल. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिष्ठाता विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखा डॉ. एस. एच. ठकार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही. डी. जाधव, डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. एस. जी. घाणे उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्यातील सामजंस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. व्ही. एस. शिर्के आदी.**

25 NOV 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिवाजी विद्यापीठ–महात्मा फुले कृषी विद्यापीठात सामंजस्य करार

**। कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतातील कृषी संशोधन प्रणाली जागतिक दर्जाची बनलेली असल्यामुळे आज आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालेला आहे. समाजाच्या आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी महाराष्ट्र राज्यातील चार आणि देशामधील ७० कृषी विद्यापीठांमध्ये संशोधन कार्य मोठ्या प्रमाणात सुरू आहे, असे मत राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

या वेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, हा सामंजस्य करार समाजास आणि शेतकरीवर्गाला उपयुक्त ठरेल. जगाच्या पाठीवरील प्रत्येक वनस्पती उपयोगी असते. त्यांचे संवर्धन करून मानवाच्या विकासामध्ये त्या वनस्पतींचा कसा उपयोग होईल, यावर संशोधकांनी महत्त्वपूर्ण काम करणे आवश्यक आहे. कृषी पिके आणि औषधी वनस्पतींमुळे भारताचे महत्त्व जागतिक पातळीवर गणले जाणार आहे.

या सामंजस्य करारांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाने आजरा घनसाळ, काळा जिरगा आणि ब्लॅक राईस या स्थानिक देशी वाणांच्या उन्नतीचे जे कार्य केले आहे, त्याचे परीक्षण राज्य आणि देश पातळीवर करण्यासाठी या करारातून पुढील कार्य होणार आहे.

याप्रसंगी महात्मा फुले कृषी विद्यापीठतर्फे कुलसचिव डॉ. व्ही. एस. शिर्के, कृषी महाविद्यालय कोल्हापूर येथील प्राचार्य डॉ. सातापा खरबडे, वित्त अधिकारी सदाशिव पाटील, शेंडा पार्क येथील कृषी संशोधन केंद्राचे डायरेक्टर डॉ. ए. ए. पिसाळ, इगतपुरी येथील कृषी संशोधन केंद्राचे डायरेक्टर डॉ. हेमंत पाटील, डॉ. सुनील कराड, डॉ. शैलेश कुंभार उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिष्ठाता विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखा डॉ. एस. एच. ठकार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, व वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. डी. जाधव, डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. एस. जी. घाणे, डॉ. के. बी. पवार, डॉ. एस. ए. पाटील, डॉ. एम. एस. निंबाळकर, डॉ. एस. एम. पाटील, डॉ. जे. पी. जाधव, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. ए. ए. देशमुख, डॉ. एस. आर. एनकंची, डॉ. पी. डी. पाटील आदी उपस्थित होते.

25 NOV 2023
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशाची कृषी संशोधन प्रणाली जागतिक दर्जाची

## डॉ. पी. जी. पाटील यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठ व महात्मा फुले कृषी विद्यापीठात सामंजस्य करार : सर्वांना होणार फायदा

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतातील कृषी संशोधन प्रणाली जागतिक दर्जाची बनलेली असल्यामुळे आज आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालेला आहे. समाज व शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी राज्यातील चार आणि देशामधील सतर कृषी विद्यापीठांमध्ये संशोधन कार्य सुरू असल्याची माहिती राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी दिली. शिवाजी विद्यापीठ व महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य करार प्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये हा कार्यक्रम झाला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू दिगंबर पाटील, कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील, डॉ. व्ही. एस. शिर्के, डॉ. सातापा खरबडे, प्र–कुलगुरू डॉ पी. एस. पाटील, डॉ. एस. एच. ठकार आदी.

यावेळी डॉ. शिर्के म्हणाले, हा सामंजस्य करार समाजास आणि शेतकरी वर्गाला उपयुक्त ठरेल. जगाच्या पाठीवरील प्रत्येक वनस्पती उपयोगी असते. त्याचे संवर्धन करून मानव विकासामध्ये कसा उपयोग होईल यावर संशोधकांनी महत्त्वपूर्ण काम करणे आवश्यक आहे. कृषी पिके आणि औषधी वनस्पतींमुळे भारताचे महत्त्व जागतिक पातळीवर गणले जाणार आहे. सामंजस्य करारामधून कृषी आणि अकृषी विद्यापीठातील दरी कमी होईल आणि दोन्ही विद्यापीठाच्या माध्यमातून विद्यार्थी आणि समाज यांना विद्यापीठातील उपलब्ध असलेल्या सुविधांचा फायदा करून देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे, असे आवाहन केले.

यावेळी महात्मा फुले कृषी विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. व्ही. एस. शिर्के, कृषी महाविद्यालय कोल्हापूर प्रा. डॉ. सातापा खरबडे, वित्त अधिकारी सदाशिव पाटील, शेंडा पार्क येथील कृषी संशोधन केंद्राचे डॉ. ए. ए. पिसाळ, इगतपुरी येथील कृषी संशोधन केंद्राचे डॉ. हेमंत पाटील, डॉ. सुनील कराड, डॉ. शैलेश कुंभार उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिष्ठता विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखा डॉ. एस. एच. ठकार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, व वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही. डी. जाधव, डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. एस. जी. घाणे, डॉ. के. बी. पवार, डॉ. एस. ए. पाटील, डॉ. एम. एस. निंबाळकर, डॉ. एस. एम. पाटील, डॉ. जे. पी. जाधव, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. ए. ए. देशमुख, डॉ. एस. आर. एन. कंची, डॉ. पी. डी. पाटील उपस्थित होते.

25 NOV 2023

जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घनसाळ, काळा जिरगाचे देशपातळीवर होणार परीक्षण

## शिवाजी विद्यापीठ -महात्मा फुले कृषी विद्यापीठात करार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारतातील कृषी संशोधन प्रणाली जागतिक दर्जाची बनलेली असल्यामुळे आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. समाजाच्या आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी महाराष्ट्र राज्यातील चार आणि

देशामधील सत्तर कृषी विद्यापीठांमध्ये संशोधन कार्य मोठ्या प्रमाणात सुरू आहे, असे मत राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी शुक्रवारी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. डॉ. शिर्के म्हणाले, हा करार समाजास आणि शेतकरी वर्गाला उपयुक्त ठरेल. प्रत्येक वनस्पती उपयोगी असते. त्याचे संवर्धन करून मानवाच्या विकासामध्ये त्या वनस्पतींचा कसा उपयोग होईल यावर संशोधकांनी काम करणे आवश्यक आहे.



शिवाजी विद्यापीठ आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्यात शुक्रवारी सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डॉ. पी. जी. पाटील, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

या कराराअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागाने आजरा घनसाळ, काळा जिरगा, काळ भात आणि ब्लॅक राइस या स्थानिक देशी वाणांच्या उन्नतीचे जे कार्य केले आहे त्याचे परीक्षण राज्य आणि देश पातळीवर करण्यासाठी या करारातून पुढील कार्य होणार आहे. या कराराअंतर्गत भविष्यात विद्यापीठातून तयार होणारे विविध पिकांचे आणि औषधी वनस्पतींचे सुधारित वाण व त्याचे राज्य व देश पातळीवरील ट्रायल्सही महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने केले जाईल.

यावेळी महात्मा फुले कृषी विद्यापीठतर्फे कुलसचिव डॉ. व्ही. एस. शिर्के कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सातापा खरबडे, वित्त अधिकारी श्री. सदाशिव पाटील, शेंडा पार्क येथील कृषी संशोधन केंद्राचे संचालक डॉ. ए. ए. पिसाळ, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ पी. एस. पाटील, डॉ. एस. एच. ठकार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, व वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. डी. जाधव, डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. एस. जी. घाणे, डॉ. के. बी. पवार, डॉ. एस. ए. पाटील उपस्थित होते.

25 NOV 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठाची नवी सुविधा : दुबार प्रमाणपत्र एकदा देण्याची अट रद्द

# ‘क्यूआर कोड’ने होणार पदवीची पडताळणी

▶ संतोष मिठारी: सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्राची पडताळणीची प्रक्रिया आता अधिक सोपी होणार आहे. त्यासाठी प्रमाणपत्रावर क्यूआर कोड देऊन त्याद्वारे पडताळणी करण्याची नवी सुविधा विद्यापीठ उपलब्ध करून देणार आहे. पुढील वर्षीच्या दीक्षान्त समारंभापासून क्यूआर कोड असलेली प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. पदवीचे दुबार (डुप्लिकेट) प्रमाणपत्र एकदा देण्याची अट देखील रद्द झाली आहे.

नोकरी, उच्च शिक्षणासाठी पदवीची पडताळणी केली जाते. सध्या ती प्रक्रिया ऑफलाईन स्वरूपात आहे. ही प्रक्रिया कमी वेळेत करण्याचे विद्यापीठाचे प्रयत्न सुरू होते. विद्यार्थी हितासाठी याबाबत अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्रशासनाकडे पाठपुरावा केला. त्यांनी प्रमाणपत्रावर क्यूआर कोड देण्यासह पदवीचे दुबार प्रमाणपत्र एकदाच घेण्याची अट शिथिल करण्याची मागणी केली. त्यावर सकारात्मक कार्यवाही विद्यापीठाच्या पदवीदान आणि संगणक विभागाने केली. त्यानुसार पदवी प्रमाणपत्रावर क्यूआर कोड देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. शासकीय, निमशासकीय, खासगी संस्थांच्या पातळीवर शुल्क आकारणी वेगळीवेगळी असल्याने त्यात त्रुटी राहू नये. यंदाच्या प्रमाणपत्राची छपाई पूर्ण झाली आहे, त्यामुळे क्यूआर कोड पुढील वर्षीच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभावेळी पदवी प्रमाणपत्रावर दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांकडून पदवी प्रमाणपत्र गहाळ झाल्यास आता फक्त एकदाच दुबार प्रमाणपत्र मिळते. शिवाय त्यासाठी शंभर रुपयांच्या स्टॅम्पवर ॲफिडेव्हिट (प्रतिज्ञापत्र) करावे लागते. पोलिस ठाण्यात एफआरआय द्यावी लागते. मात्र, आता त्यातील ॲफिडेव्हिट आणि एकदा प्रमाणपत्र देण्याची अट दंडक समितीने रद्द केली आहे. या दोन्ही निर्णयामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

> पदवी प्रमाणपत्रावर क्यूआर कोड उपलब्ध करून दिल्याने आणि प्रमाणपत्र केवळ एकदाच मिळण्याचा नियमही रद्द होणार असल्याने विद्यार्थ्यांचा त्रास कमी होणार आहे. हरवलेल्या प्रमाणपत्राबाबत एफआयआर नोंद करण्याची सक्ती अधिकार मंडळांच्या माध्यमातून रद्द करण्यासाठी पाठपुरावा करणार आहे.
>
> **-ॲड. अभिषेक मिठारी**, अधिसभा सदस्य

> क्यूआर कोडमुळे ऑनलाईन स्वरूपात थेट शिवाजी विद्यापीठाच्या संगणक प्रणालीतून पदवी प्रमाणपत्राची पडताळणी होणार आहे. पुढील टप्प्यात प्रमाणपत्र डिजीलॉकरमध्ये उपलब्ध करून दिले जाणार आहे.
>
> **-डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

### पदवीच्या प्रत्येक प्रमाणपत्रावर कोड

**■ प्रत्येक विद्यार्थ्याच्या पदवी प्रमाणपत्रावर वरच्या बाजूला क्यूआर कोड दिला जाणार आहे. संबंधित स्कॅन केल्यानंतर त्या प्रमाणपत्राची पडताळणी ऑनलाईन होणार आहे. त्यात विद्यार्थ्याचे नाव, पीआरएन नंबर, विषय, उत्तीर्णतेचे वर्ष आदी माहिती क्षणात मिळणार आहे. नोकरी, उच्च शिक्षणासाठी या प्रमाणपत्राची पडताळणी प्रक्रिया सोपी आणि वेगवान होणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले. क्यूआर कोडचा निर्णय आता झाला. त्यापूर्वी यंदाच्या ५० हजार प्रमाणपत्राची छपाई पूर्ण झाली आहे. त्यामुळे प्रमाणपत्रावर क्यूआर कोड देण्याची कार्यवाही पुढील वर्षीच्या दीक्षान्त समारंभापासून होईल, असे त्यांनी सांगितले.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 NOV 2023

पुण्यनगरी

# विद्यापीठातील निसर्गोपचार शिबिर उत्साहात

**कोल्हापूर :** ज्येष्ठ नागरिकांच्या विविध प्रश्नांबाबत शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडून विविध उपक्रम राबवले जातात. त्याअंतर्गत योग व निसर्गोपचार शिबिर शिक्षणाशास्त्र सभागृहात घेण्यात आले. यासाठी फेसकॉमचे समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष दिलीप पेटकर, सचिव श्रीकांत अडिवरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते. शिबिरामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या विविध आरोग्य समस्यांविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. ॲक्युप्रेशरतज्ज्ञ अरविंद पालके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी टी. आर. गुरव, अडिवरेकर यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन रवींद्र खैरे यांनी केले. आभार सहायक प्राध्यापक यशोधन बोकील यांनी मानले. वसंत सिंघन, आर. एम. जाधव, उदय घाटे, सुधाकर भोसले, मंगल पाटील, डॉ. श्वेतालीना पाटील, रामचंद्र पाटील, बाळासाहेब पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 NOV 2023
तरुण भारत

# विद्यापीठात योग शिबीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी योग व निसर्गोपचार शिबीर घेण्यात आले.या शिबीराला ज्येष्ठ नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. ज्येष्ठ नागरिकांच्या निरोगी व निरामय आयुष्यासाठी योग व निसर्गोपचार शिबिर शिक्षणाशास्त्र सभागृहात झाले. अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ.रामचंद्र पवार होते. तर फेसकॉमचे समन्वय समितीचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष दिलीप पेटकर, सचिव श्रीकांत अडिवरेकर यांची उपस्थिती होती. शिबिरामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या विविध आरोग्य समस्या विषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. ॲक्युप्रेशर तज्ञ अरविंद पालके यांनी मार्गदर्शन केले. स्वागत व प्रास्ताविक अरविंद पालके यांनी केले. सूत्रसंचालन रवींद्र खैरे यांनी केले तर आभार सहाय्यक प्रा. यशोधन बोकील यांनी मानले.यावेळी डॉ.रामचंद्र पवार वसंत सिंघण, आर.एम. जाधव, उदय घाटे, सुधाकर भोसले, मंगल पाटील, डॉ.श्वेतालीना पाटील, उपस्थित होते.

25 NOV 2023
पुण्यनगरी

# क्रीडा स्पर्धेत परितकर महाविद्यालयाचे यश

**सुळे : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असणाऱ्या आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेत लहू बाळा परितकर (ता. पन्हाळा) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले. जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी व शिवाजी विद्यापीठ आयोजित फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील रोहन पाटील याने ६५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक, दिग्विजय पाटील याने ५७ किलो गटात द्वितीय क्रमांक पटकावला. अक्षय मुळीक याने चतुर्थ क्रमांक मिळवला. रोहन पाटील याची चंदीगड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे.

५० महाविद्यालयांचा सहभाग असणाऱ्या या क्रीडा स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद परितकर महाविद्यालयास प्राप्त झाले. त्याचबरोबर शहाजी कॉलेज येथे आयोजित नेमबाजी स्पर्धेमध्ये सुमित सासने याने नेमबाजी (रायफल शूटिंग) स्पर्धेत प्रथम क्रमांक व प्रतीक जोंग याने द्वितीय क्रमांक मिळवला. कोवाड कॉलेज आयोजित ॲथलेटिक्स स्पर्धेत अभय सोनार याने लांब उडीत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. या विद्यार्थ्यांना संस्थापक अध्यक्ष मारुतीराव परितकर, कार्याध्यक्ष मंदार परितकर, कुस्ती प्रशिक्षण अमर निंबाळ्कर, विजय बराटे, संतोष कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

25 NOV 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, को...

# अनुष्का पाटीलची राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत कोल्हापूरच्या अनुष्का पाटील हिने १० मीटर एअर पिस्टल व २५ मीटर स्पोर्टस् पिस्टल या दोन्ही गटांत प्रथम क्रमांक पटकाविला.



स्पर्धेत ४० महाविद्यालयांतून १०५ स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेतील कामगिरीच्या जोरावर अनुष्काची निवड दि. ८ ते ११ डिसेंबर या कालावधीत नवी दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठीय नेमबाजी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. तसेच ३ ते ८ जानेवारी २०२४ मध्ये कुरुक्षेत्र येथे होणाऱ्या दक्षिण-पश्चिम विभागीय विद्यापीठीय नेमबाजी स्पर्धेतही ती सहभागी होणार आहे. अनुष्का गडहिंग्लजच्या शिवराज कॉलेजची विद्यार्थिनी असून, ती क्रीडा प्रबोधिनीची अनिवासी खेळाडू आहे. तिला प्राचार्य सुहास पाटील, संदीप तरटे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 NOV 2023
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झोनल स्पर्धेत प्रिती कांबळेला कांस्यपदक



कागल : दि. कागल एज्युकेशन सोसायटी संचलित बी. एड्. कॉलेज, कागलला शिवाजी विद्यापीठ अंतर्गत घेण्यात आलेला झोनल स्पर्धेत वैयक्तिक स्पर्धेत कास्य पदक मिळाले. बी. एड्. कॉलेज कागलची विद्यार्थीनी कु. प्रिती अनिल कांबळे हिने हॅमर-थ्रो या वैयक्तिक खेळ प्रकारात भाग घेतला होता. पुढे होणाऱ्या इंनटर झोनल स्पर्धेसाठी तिची निवड करण्यात आली आहे. तिला कॉलेजच्या प्राचार्य डॉ.एस. एस.लकाडे यांचे मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली. तसेच संस्थेचे सचिव भैय्या माने, उपाध्यक्ष सुनिल माने, संचालक बिपिन माने व कॉलेजचे प्रा. सी. आर. पोवार, यांचे सहकार्य व मार्गदर्शन लागले.